# कांदा, टोमॅटोचे उत्पादन घटले; बटाट्याचे ६ टक्क्यांनी वाढले

## देशाचा पहिला फळे, भाजीपाला उत्पादनाचा अंदाज जाहीर

पुणे : देशातील फळे आणि भाजीपाला उत्पादनात यंदा जवळपास ४० लाख टनांनी वाढ झाली. २०२२-२३ मध्ये देशातील फळे आणि भाजीपाला पिकांचे उत्पादन ३ हजार ५०८ लाख टनांवर पोहोचले. यंदा देशात कांदा आणि टोमॅटो उत्पादन घटले, तर बटाटा उत्पादनात मोठी वाढ झाली, असे केंद्रीय कृषी मंत्रालयाने पहिल्या फलोत्पादन अंदाजात म्हटले आहे. या उत्पादन वाढीसाठी कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांनी शेतकरी, कृषी शास्त्रज्ञ आणि सरकारी धोरणांना श्रेय दिले.

कृषी मंत्रालयाने म्हटले आहे की, देशातील भाजीपाला आणि फळ पिकांखालील लागवड क्षेत्रात वाढ झाली आहे. २०२२-२३ च्या हंगामात देशात २८३ लाख हेक्टरवर लागवड होती. गेल्या हंगामात हेच क्षेत्र २८० लाख हेक्टर लागवडीखाली होते. देशात यंदा एकूण भाजीपाला उत्पादनात जवळपास १.६ टक्क्यांनी वाढ झाली. यात बटाटा उत्पादनात वाढ झाली असून टोमॅटो आणि कांदा उत्पादनात घट झाली. देशात २ हजार १२३ लाख टन भाजीपाला उत्पादन झाले. म्हणजेच ३४ लाख टनांची वाढ झाली. गेल्या हंगामात २ हजार ९१ लाख टन उत्पादन झाले होते.

गेल्या हंगामात चांगला पाऊस झाला होता. त्यामुळे उत्पादनात वाढ झाली, असे सरकारने म्हटले होते. जाणकारांच्या मते, मागील हंगामात सरकारच्या पहिल्या आणि शेवटच्या अंदाजात फारसा फरक पडला नव्हता. त्यामुळे यंदाही असाच अनुभव येऊ शकतो. यंदा देशातील भाजीपाला पिकांच्या उत्पादनात १.६ टक्क्यांची वाढ झाली आहे. तर फळ उत्पादनातही काहीशी वाढ झाली. यंदा फळ उत्पादन १ हजार ७७ लाख टनांवर पोहोचले. तर गेल्या हंगामातील उत्पादन १ हजार ७५ लाख टनांवर होते.

### बटाटा उत्पादन पोहोचले ५९७ लाख टनांवर





देशात यंदा ३११ लाख टन कांदा उत्पादनाचा अंदाज आहे. गेल्या हंगामात ३१७ लाख टन उत्पादन झाले होते. म्हणजेच यंदा कांदा उत्पादन २ टक्क्यांनी घटले. तर टोमॅटो उत्पादनात किंचित घट झाली. गेल्या हंगामात देशात २०७ लाख टन टोमॅटो उत्पादन होते. ते यंदा २०६ लाख टनांवर पोहोचले. बटाटा उत्पादनात मात्र यंदा तब्बल ६.३ टक्क्यांनी वाढ झाली. यंदा उत्पादन ५९७ लाख टनांवर पोहोचले. गेल्या हंगामात बटाटा उत्पादन ५६२ लाख टनांवर स्थिरावले होते.

Agrowon Dt. 30/06/2023

# 'पणन'च्या आंबा महोत्सवात १८ कोटी ७५ लाखांची उलाढाल

पुणे : राज्य कृषी पणन मंडळामार्फत 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजनेंतर्गत जिल्हा परिषदेच्या मार्केट यार्डातील जागेत भरविण्यात आलेल्या आंबा महोत्सवात रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथील हापूस आंबा आणि कोल्हापूर व सातारा जिल्ह्यातील केशर आंब्यांची सुमारे अडीच लाख डझन इतकी विक्रमी विक्री झाली. त्यातून शेतकऱ्यांनी स्वतः विक्रमी १८ कोटी ७५ लाख रुपयांच्या आंब्यांची विक्री केली आहे. १ एप्रिल ते ३ जून या कालावधीत महोत्सवात ६७ स्टॉल होते. त्यात १०५ आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. एप्रिलमध्ये आवक कमी असल्यामुळे सुरुवातीस प्रतिडझनाचा दर ७०० ते १२०० रुपये राहिला. आवक वाढल्यानंतर मे महिन्यात हाच दर ५०० ते ७०० रुपये आणि २० मेनंतर तो ३०० ते ५०० रुपयांपर्यंत राहिला आणि उलाढाल वाढल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी कळविली आहे. पणन मंडळाकडून २००२ पासून आंबा महोत्सवासाठी उत्पादक शेतकरी ते थेट ग्राहक, असा थेट उपक्रम राबविला आहे. त्यातून शेतकरी आणि ग्राहकांचे नाते दृढ झाल्यामुळे महोत्सवास दरवर्षी प्रतिसाद वाढला असून, आजवरची उच्चांकी म्हणजे १८.७५ कोटी रुपयांची उलाढाल झाली. पणनचा आंबा महोत्सव आता एक विश्वासार्ह ब्रँड झाला आहे, असे पणन मंडळाच्या देशांतर्गत व्यापार विभागाचे सहायक सरव्यवस्थापक मंगेश कदम यांनी सांगितले.

Agrowon Dt.16/06/2023

# 'माहूर'च्या तांबूलला 'जीआय'साठी तत्त्वतः मान्यता

## रेणुकामातेच्या मुख्य प्रसादात आहे समावेश ● वैशिष्ट्यपूर्ण चव आणि गंधासाठी आहे प्रसिद्ध

**पुणे/नांदेड :** साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या माहूरच्या रेणुकादेवी मंदिरातील मुख्य प्रसादात समावेश असलेल्या 'तांबूल'ला भौगोलिक मानांकनाकरिता (जीआय) तत्त्वतः मान्यता मिळाली आहे. पुरणपोळीच्या नैवेद्यानंतर तांबूलाचा प्रसाद देवीला दाखविला जातो. तांबूल देवीच्या मुखात ठेवून त्यातील अर्धा भाग भक्त प्रसाद म्हणून सेवन करतात. याशिवाय अनेक जण सहा महिने, वर्षभर पुरेल एवढा तांबूल विकतही घेऊन जातात.

नागवेलीची पाने, काथ, सुपारी, चुना, बडीशेप, ओवा, लवंग, विलायची, कलमी, ज्येष्ठमध, जायपत्री, आसमान तारा, चमन बहार असे साहित्य वापरून तांबूल तयार केले जाते. तांबूल कुटण्यासाठी विशिष्ट प्रकारचा कोदवा दगड वापरला जातो, तोही याच परिसरात मिळतो. विड्याची पाने विडूळ (ता. उमरखेड) तसेच शेजारील तेलंगणा राज्यातील आदिलाबाद जिल्ह्यातून आणली जातात. आता माहूर परिसरातील लांजी, गुंडवळ अशा काही गावांत ही पाने उपलब्ध होत आहेत.

या तांबूलला 'त्रयोदशी गुणी' विडाही



म्हटले जाते. याचे महत्त्व आयुर्वेदातही सांगितले आहे. पचनास गुणकारी, रक्तशुद्धीकरण तसेच खोकल्यावर उपयुक्त हा विडा मानला जातो. जेवणानंतर मुखशुद्धीसाठी विडा, तांबूल वापरतात. तिरुपती बालाजी येथील प्रसादाच्या लाडूला मिळालेल्या 'जीआय'च्या (भौगोलिक मानांकन) पार्श्वभूमीवर माहूरच्या तांबूलाचे वेगळेपण आणि औषधी गुणधर्म पाहता ऑगस्ट २०२२ मध्ये यांस जीआयसाठी अर्ज दाखल करण्यात आला होता. चार महिने त्यावर संशोधन झाले. हा अर्ज जागतिक बौद्धिक संपदा संघटनेने स्वीकारला असून, त्याचा परीक्षण अहवालदेखील आला आहे. त्यानुसार माहूरच्या तांबूलला 'जीआय टॅग'साठी तत्त्वतः मान्यता मिळाली आहे. आता लवकरच हा 'टॅग' माहूरच्या तांबूलला मिळेल, असे ग्रेट मिशन ग्रुप कन्सल्टन्सीचे (पुणे) चेअरमन प्रा. गणेश हिंगमिरे यांनी सांगितले.

> **“ आमचा पिढीजात तांबूल करून विक्रीचा व्यवसाय आहे. भाविक आपली श्रद्धा आणि नवसानुसार ११ ते ११०० पानांचा तांबूल रेणुकामातेला अर्पण करतात. जीआय मानांकन मिळाल्यावर याची ख्याती अजून वाढेल, त्यातून व्यवसाय वृद्धी पण होईल.**
>
> **- अमोल गावंडे,**
> तांबूल विक्रेते, माहूर, जि. नांदेड

> **“ माहूरच्या तांबूलला जीआय मान्यता मिळण्याची प्रक्रिया चालू असून, ती काही महिन्यांत पूर्ण होऊन हा टॅग मिळेल. महाराष्ट्राला उच्च पातळीवर नेणारा हा आमचा चाळिसावा जीआय ठरेल, याचा आनंद आणि अभिमान आहे.**
>
> **- प्रा. गणेश हिंगमिरे,**
> चेअरमन, जीएमजीसी, पुणे

Agrowon Dt. 16/06/2023

# बांगलादेशने निर्बंध हटवले; उन्हाळ कांद्याचे दर २५० रुपयांनी वाढले

## नाशिक जिल्ह्यातील स्थिती; दर वाढूनही उत्पादन खर्चाच्या खाली परतावा

मुकुंद पिंगळे : ॲग्रोवन वृत्तसेवा

नाशिक : खरीप आणि लेट खरीप कांद्यानंतर उन्हाळ कांद्याच्या हंगामाच्या सुरुवातीपासून दरात अपेक्षित सुधारणा नसल्याने शेतकऱ्यांची मोठी आर्थिक कोंडी झाली आहे. त्यातच वादळी वाऱ्यासह पाऊस व गारपिटीने जिल्ह्यातील कांदा उत्पादक पट्ट्यात मोठे नुकसान आहे. अशा परिस्थितीत मोठी कोंडी झाली होती. हजार



रुपयांच्या आत दर मिळत असल्याने जून महिन्याच्या सुरुवातीला शेतकऱ्यांना दरवाढ होण्याची अपेक्षा होती. आता स्थिर झालेली आवक व पान ४ वर »




**गेल्या हंगामापासून कांद्याच्या दरात अपेक्षित सुधारणा नाही. चालूवर्षी पावसामुळे काढणीदरम्यान नुकसान अधिक आहे. तर काढणीपश्चात साठवलेला कांदा चाळीत खराब होत आहे. सध्या कांद्याच्या दरात सुधारणा झाली असली तरी उत्पादन खर्चाच्या खाली दर आहेत. नाफेड कांदा खरेदी सुरू होऊनही अपेक्षित दिलासा नाही.**

**– मधुकर मोरे**, कांदा उत्पादक, मोरेनगर, ता. सटाणा

---

# बांगलादेशने निर्बंध हटवले; उन्हाळ कांद्याचे दर २५० रुपयांनी वाढले

» पान १ वरून

बांगलादेशने आयातीवरील निर्बंध हटवल्याने कांदा दारात सुधारणा दिसून आली आहे. प्रतिक्विंटल मागे २०० ते २८० रुपयांपर्यंत सुधारणा झाल्याचे चित्र आहे. मात्र बाजारनिहाय आवक व प्रतवारीनुसार दर वेगवेगळे आहे.

जिल्ह्यात उन्हाळ कांद्याच्या बाजारात शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या खाली कांद्याची विक्री करावी लागली. अशातच

**एप्रिल-मे महिन्यात अनेक बाजार आवारात स्थानिक कांदा उपलब्ध होता. त्यामुळे मागणी कमी असल्याने पुरवठा होत नव्हता. त्यातच पावसामुळे कांदा खराब झाल्याने दरावर परिणाम होता. मागणी कमी असल्याने निर्यातीवर परिणाम दिसून आला. मात्र बांगलादेशसारख्या प्रमुख आयातदार देशाने आयातीवर निर्बंध काढल्याने दरात सुधारणा झाली आहे.**

**– खंडू काका देवरे**, अध्यक्ष नाशिक जिल्हा कांदा व्यापारी असोसिएशन

सोमवारी (ता. ५) जिल्ह्यात पिंपळगाव बसवंत कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सर्वाधिक आवक होऊनही उन्हाळ कांद्याच्या दरात क्विंटलमागे ३०० रुपयांची वाढ दिसून आली. जून महिन्याच्या सुरुवातीला हे दर ७५० ते ८५० रुपयांदरम्यान निघाले होते. जून महिन्यात पहिल्या सप्ताहात होणारी आवक २७ हजार क्विंटल होती. मात्र शनिवारी (ता. ३) आवकेत घसरण होऊन १७ हजार क्विंटलवर आली होती. मात्र सोमवारी (ता. ५) पुन्हा आवकेत वाढ होऊन ३४,३७५ क्विंटल आवक झाली आहे. यापूर्वी जूनच्या सुरुवातीला प्रतिक्विंटल ७०१ रुपये सरासरी दर मिळाला होता. तर आता सरासरी दर १,१०० रुपयांवर आले आहेत. तर उच्चांकी २,२०० रुपये दर येथेच मिळाला आहे.

मागील महिन्यात वादळी वाऱ्यासह पाऊस व गारपिटीमुळे अनेक भागात मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे कांदा सडण्याचे भीतीपोटी शेतकऱ्यांनी हा माल बाजारात विकण्याची घाई केली. परिणामी दरावर परिणाम होता. शिवाय मागणीच्या तुलनेत देशांतर्गत पुरवठा व निर्यात कमी झाल्याने दरात नरमाई होती. मात्र आता स्थिर आवक व वाढत असलेल्या मागणीमुळे दर वाढत आहेत. तर शेतकऱ्यांनी कांदा साठवून ठेवल्यानंतर टप्प्याटप्प्यात चांगल्या प्रतवारीचा कांदा बाजारात येऊ लागल्याने दरात सुधारणा झाल्याचे बाजार समितीचे सूत्रांनी सांगितले.

### जिल्ह्यातील आवक (क्विंटलमध्ये) व दर (रुपयांत)

| बाजार समिती | आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|---|
| पिंपळगाव बसवंत | ३४,३७५ | २०० | २,२०० | १,१०० |
| लासलगाव | १६,००० | ६०० | १,५०० | ९०० |
| सटाणा | १५,२५० | २०० | १,३५० | ८५० |
| कळवण | २०,२०० | १५० | १६०० | १०५० |
| येवला | १०,००० | ३०० | १,०७१ | ८०० |
| सिन्नर | २,७०४ | १०० | १,०८३ | ७०० |
| चांदवड | ११,००० | २१२ | १,२८० | ७८० |
| देवळा | १०,५०० | १०० | १,२३० | ९०० |

(संदर्भ: महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ)

Agrowon Dt. 06/06/2023